MHSO100013472023

-

**नियमित दिवाणी दावा क्र.६१०/२०२३**
**मधील नि.क्र.४४ खालील आदेश.**

प्रतिवादी क्र.६ व १३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–६, नियम–१७ प्रमाणे कैफियत दुरुस्तीसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे गट विभाजन होवून हद्दीखुणा कायम होवून मिळण्यासाठी व कायमचे मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. सदरच्या अर्जात प्रतिवादींनी कथन केले आहे की, सदरचे दाव्यात मोजणी करण्यासाठी नि.क्र.०५ ला मोजणीचा अर्ज देवून उपअधिक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यासाठी अर्ज देण्यात आला होता. सदरचा अर्ज मंजूर होवून न्यायालयीन आयुक्त यांनी दावा मिळकतींची मोजणी मो.र.क्र.६३९/२०१३ अन्वये ता.२०.०३.२०१५ रोजी करुन त्यांचा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला आहे. सदरच्या मोजणीचा नकाशा पाहिला असता प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी त्यांचे गट क्र.७२५/८ मधून प्रतिवादी क्र.१३ याचे गट क्र.७२५/९ मध्ये पश्चिम बाजूने १.५४ हे.आर. क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे.

२. प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी प्रतिवादी क्र.१३ चे गट क्र.७२५/९ मध्ये १.५४ हे.आर. क्षेत्रामध्ये केलेल्या अतिक्रमणाच्या

**नि.क्र.४४ खालील आदेश.**

चतुःसिमा पुर्वेस–गट क्र.७२५/९ पैकी संजय गणपत पांढरे यांचे शिल्लक क्षेत्र, दक्षिणेस–नातेपुते–फोंडशिरस रस्ता, पश्चिमेस–गट क्र.७२५/८ नामदेव माणिक पांढरे व विजय माणिक पांढरे यांचे क्षेत्र, उत्तरेस–फोंडशिरस फॉरेस्ट अशा आहेत. सदरचे मो.र.क्र.६३९/२०१३ चा मोजणी नकाशा पाहिला असता वादींनी त्यांचे गट क्र.७२५/४ मधून प्रतिवादी क्र.६ याचे गट क्र.७२५/३ मध्ये दक्षिण बाजूने ०.२४ हे.आर. क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे. वादीने प्रतिवादी क्र.६ चे गट क्र.७२५/३ मध्ये ०.२४ हे.आर. क्षेत्रामध्ये केलेल्या अतिक्रमणाच्या चतुःसिमा पुर्वेस गट क्र.७२५/८, दक्षिणेस–पांडुरंग रघुनाथ पांढरे याचे गट क्र.७२५/४ पैकी शिल्लक, पश्चिमेस–ओढा, उत्तरेस–गट क्र.७२५/२ माणिक कृष्णा पांढरे याचे क्षेत्र अशा आहेत. प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी प्रतिवादी क्र.१३ याचे गट क्र.७२५/९ मध्ये १.५४ हे.आर. मध्ये अतिक्रमण केलेले आहे. त्याप्रमाणे मो.र.क्र.६३९/२०१३ मधील नकाशामध्ये दर्शविण्यात आलेले आहे. तसेच वादीने प्रतिवादी क्र.६ याचे गट क्र.७२५/३ मध्ये ०.२४ हे.आर. मध्ये अतिक्रमण केलेले आहे व ते सदरच्या मोजणी नकाशात दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दुरुस्तीचा अर्ज देणे भाग पडत आहे.

३. प्रतिवादींना त्यांच्या कैफियतीमध्ये कलम–९ चे पुढे ९अ प्रमाणे पुढील मजकूर समाविष्ठ करावयाचा आहे. ''प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी त्यांचे गट क्र.७२५/८ मधून प्रतिवादी क्र.१३ याचे गट क्र.७२५/९ मध्ये पश्चिम बाजूने १.५४ हे.आर. क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे. ते केशरी रंगाने मो.र.क्र.६३९/२०१३ चे मोजणीचे नकाशामध्ये दाखविलेले आहे. तसेच वादींनी त्यांचे गट क्र.७२५/४ मधून प्रतिवादी क्र.६ याचे गट

क्र.७२५/३ मध्ये दक्षिण बाजूने ०.२४ हे.आर. क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे. ते हिरव्या रंगाने मो.र.क्र.६३९/२०१३ चे मोजणी नकाशामध्ये दाखविलेले आहे. प्रतिवादी क्र.६ व १३ यांनी वादी व प्रतिवादी क्र.११ व १२ यांना वरील अतिक्रमीत मिळकतीचे केलेले एकूण १.५४ हे.आर. व ०.२४ हे.आर. क्षेत्राचे अतिक्रमण ता.२०.०३.२०१५ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस यांचे मार्फत त्यांनी दाखल केलेला अहवाल पाहिल्यानंतर प्रतिवादी क्र.६ व १३ यांनी वादी व प्रतिवादी क्र.११, १२ यांस प्रतिवादी क्र.६ व १३ चे दावा मिळकतीमध्ये केलेले अतिक्रमण आपसात काढून मागितले असता, वादी व प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी प्रतिवादी क्र.६ यांचे दावा मिळकत गट क्र.७२५/३ मध्ये केलेले ०.२४ आर. तसेच प्रतिवादी क्र.१३ यांचे दावा मिळकत गट क्र.७२५/९ मध्ये केलेले १.५४ हे.आर. या क्षेत्राचे अतिक्रमण काढून घेण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ व १३ यांना सदरच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती देणे भाग पडत आहे. सदरची दुरुस्ती करणेस न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे.''

४. तसेच दावा कलम १० मध्ये १०अअ असा अंक टाकून वादी व प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी प्रतिवादी क्र.६ याचे दावा मिळकत गट क्र.७२५/३ मध्ये केलेले ०.२४ हे.आर. तसेच प्रतिवादी क्र.१३ याचे दावा मिळकत गट क्र.७२५/९ मध्ये केलेले१.५४ हे.आर. या क्षेत्राचे अतिक्रमण वादी व प्रतिवादी क्र.११ व १२ यांचेकडून काढून मिळावे. वादी व प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी केलेले अतिक्रमण काढून न दिल्यास ते कोर्टामार्फत काढून मिळावे. तसेच वादी व प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी प्रतिवादी क्र.६ व १३ चे मिळकतींमध्ये केलेल्या अतिक्रमणाचा कब्जा मिळेपर्यंत दरम्यानचे

उत्पन्न प्रतिवादींना दरसाल रक्कम रु.२५,०००/– मिळावे. सदरच्या दुरुस्तीमुळे कैफियतीच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही. सदरची नियोजीत दुरुस्ती ही दावा मिळकतीची मोजणी झाल्यानंतर अतिक्रमणाबाबत समजल्यामुळे करावी लागत आहे. म्हणून शेवटी प्रतिवादींनी सदरच्या दुरुस्त्या कैफियतीमध्ये करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जास वादींनी जबाब दिलेला आहे. त्यांनी त्यात कथन केले आहे की, नियोजीत दुरुस्तीमधील मजकूर चुकीचा आहे. सदरची कैफियत दुरुस्त करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सदरची नियोजीत दुरुस्ती मुदतीत नाही. म्हणून शेवटी त्यांनी प्रतिवादींचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र.५, ७, ११ व १२ यांनी सदरच्या अर्जास नि.क्र.४६ वर जबाब दिलेला आहे. त्यांनी प्रतिवादींच्या अर्जातील सर्व मजकूर नाकारलेला आहे. त्यांनी पुढे कथन केले आहे की, त्यांनी प्रतिवादी क्र.१३ याचे गट क्र.७२५/९ मध्ये पश्चिम बाजूने १.५४ हे.आर. क्षेत्रामध्ये कधीही अतिक्रमण केलेले नव्हते व नाही. प्रतिवादी क्र.६ व ७ यांचे आपसातील वाटपामध्ये ज्याठिकाणी प्रतिवादी क्र.७ यांना वाटून मिळकत आली, त्याठिकाणी प्रतिवादी क्र.११ व १२ हे मालकीहक्काने कब्जेवहिवाट करत आहेत. सदरचे मो.र.क्र.६३९/२०१३ चा मोजणी नकाशा पाहिला असता, तो खोटा व काल्पनीक असून तो प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. तसेच प्रतिवादींची कैफियतीमधील कलम–९ नंतर ९अ ही नियोजीत दुरुस्ती प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. तसेच नियोजीत दुरुस्ती करण्याचे कारण प्रतिवादींनी खोटे व काल्पनीक दिले आहे. तसेच प्रतिवादींनी

कैफियतीमधील कलम–१० नंतर १०अअ मधील नियोजीत दुरुस्तीबाबतचा मजकूर खोटा व काल्पनीक असल्याचे म्हटले आहे.

७. सदरचे प्रकरणात वस्तुस्थिती अशी आहे की, नि.क्र.५ वरील हुकूमाप्रमाणे पोटहिस्सा मोजणी करुन पोटहिस्सा मोजणी झाल्यानंतर हद्दीखुणा दाखविण्याबाबत हुकूम झाला आहे. परंतु न्यायालयीन आयुक्त यांनी चुकीची मोजणी करुन चुकीचे पोटहिस्से पाडले आहेत. त्यांनी पोटहिस्सा पाडताना पोटहिस्स्यांचे अभिलेखातील रेषा सरळ न दाखविता तिरक्या दाखविल्या आहेत. तसेच फोंडशिरस रस्त्याच्या कडेला जे काही हिस्से पाडले, ते रस्त्याच्या कडेला ७/१२ वरील क्षेत्राप्रमाणे सर्वांना समान रस्त्याला लागून समान रुंदीचे पोटहिस्से पाडले गेले नाही. न्यायालयीन आयुक्त यांनी वहिवाटीप्रमाणे व क्षेत्राप्रमाणे मोजणी केलेली नाही. त्यांनी वहिवाटदाराकडे चौकशी न करताच व वहिवाटीप्रमाणे मोजणी न करता ते क्षेत्र दाखविले आहे. गट क्र.७२५/२ या हिस्स्यातीलच क्षेत्र हिस्सा क्र.३ मध्ये दाखविले आहे व हे क्षेत्र वाढत जावून ०.२४ हे.आर. झाले आहे. ते गट क्र.७२५/२ च्या मालकीचे आहे.

८. प्रतिवादी क्र.७ व त्याचे भाऊ प्रतिवादी क्र.६ गणपत पांढरे यांच्यामध्ये वाटप होताना प्रतिवादी क्र.७ याला खराब जमीन वाटणीस दिली असल्यामुळे प्रतिवादी क्र.७ याला आपसात जादा जमीन दिलेली होती. सदर जमीनीत भरपूर खर्च करुन व जमीनीमध्ये माती भरुन लागवडीलायक केलेली आहे. प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या आपसातील सरस निरस मानाने झालेल्या वाटपाप्रमाणे वहिवाटी आहेत व तशाच वहिवाटी ठेवण्यात याव्यात. गट क्र.७२५ चा हिस्सा, हिस्सा क्र.११ व १२ हा सदरचे प्रतिवादींच्या वहिवाटीत असल्यामुळे तो प्रतिवादी क्र.७ व

प्रतिवादी क्र.७ ची मुले यांचे नावे असणारी मिळकत गट क्र.७२५/८ हा पुर्ण हिस्सा प्रतिवादी क्र.६ व १३ यांना देण्यास प्रतिवादी क्र.७ व त्यांची मुले तयार आहेत. प्रतिवादी क्र.७ व त्यांची मुले यांना मिळालेल्या आपसातील वाटपाप्रमाणेच त्यांच्या वहिवाटी आहेत. प्रतिवादी क्र.७ व त्यांची मुले यांनी प्रतिवादी क्र.६ व १३ यांचे नावावरील मिळकतीत कधीही अतिक्रमण केलेले नव्हते व नाही. प्रतिवादी क्र.७ याचे वहिवाटीस असलेले क्षेत्र प्रतिवादी क्र.७ ची मुले यांना देण्यात यावे. प्रतिवादी यांची मुले यांच्यामध्ये तसेच प्रतिवादी यांनी स्वतः पैसे खर्च करुन पाडलेली विहीर दुस–यांच्या हिस्स्यांमध्ये दाखविली आहे. सदर विहीरीवरती प्रतिवादी यांची इलेक्ट्रीक मोटार आहे. सदर विहीरीवरुन पाईपलाईन नेण्यास प्रतिवादी यांनी भरपूर खर्च केला आहे. सदरची विहीर हद्दीखुणा दाखविल्या तेव्हा म्हणजे ता.२४.०२.२०१५ रोजी प्रथमच पोटहिस्सा मोजणी चुकीचे केल्याचे प्रतिवादींना समजले. सदरची पोटहिस्सा मोजणी ही चुकीची केली असल्यामुळे सदरच्या प्रतिवादी क्र.७ यांना गट क्र.७२५ ची पोटहिस्सा मोजणी मान्य व कबूल नाही. त्यामुळे शेवटी त्यांनी सदरचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज रद्द करण्यात यावा असे म्हटले आहे.

९. वर नमुद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयांवर मी माझे कारणांसह खालील निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरची नियोजित कैफियत दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |

**नि.क्र.४४ खालील आदेश.**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | आदेश काय? | ... | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

१०. मी प्रतिवादी क्र.६ व १३ तर्फे विद्वान वकील श्रीमती गाडे व वादींचे विद्वान वकील श्री.एस.एस.पिसाळ व प्रतिवादी क्र.५, ७, ११ व १२ तर्फे विद्वान वकील श्री.व्ही.टी.पिसाळ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.६ व १३ च्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, नि.क्र.५ च्या मोजणीच्या अर्जाप्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांनी दावा मिळकतींची मोजणी करुन त्याबाबत त्यांचा अहवाल दाखल केल्यानंतर, प्रतिवादी क्र.६ व १३ यांना माहित झाले की, प्रतिवादी क्र.११, १२ व वादींनी त्यांच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे त्याबाबत त्यांना त्यांच्या कैफियतीमध्ये संबंधीत दुरुस्त्या करावयाच्या आहेत. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. याउलट, वादींचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादींच्या नियोजीत दुरुस्तीमुळे त्यांच्या बचावाच्या स्वरुपात बदल होत आहे. सदरची नियोजीत दुरुस्ती मुदतीत नाही. म्हणून त्यांनी प्रतिवादी क्र.६ व १३ चा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.५, ७, ११ व १२ चे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी प्रतिवादी क्र.६ व १३ च्या मिळकतीत कोणतेही प्रकारचे अतिक्रमण केलेल नाही. न्यायालयीन आयुक्तांनी चुकीची मोजणी व अहवाल दाखल केला आहे. सदरची मोजणी त्यांना मान्य नाही. म्हणून शेवटी त्यांनी प्रतिवादी क्र.६ व १३ चा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

११. मी सदरचे दाव्यातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.६ व १३ च्या मते, न्यायालयीन आयुक्त यांनी त्यांचा अहवाल दाखल केल्यावर त्यांना माहित झाले की, प्रतिवादी क्र.११, १२ व वादीने त्यांच्या मिळकतीवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या कैफियतीमध्ये संबंधीत दुरुस्त्या करावयाच्या आहेत. याउलट, वादी व प्रतिवादींनी न्यायालयीन आयुक्त यांचा अहवाल चुकीचा आहे, असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.६ व १३ यांना नियोजीत दुरुस्ती ही न्यायालयीन आयुक्त यांचा अहवाल आल्यानंतर करावी लागत आहे. न्यायालयीन आयुक्त यांचा अहवाल चुकीचा आहे की बरोबर आहे, हे दोन्ही पक्षांचा पुरावा आल्यानंतर स्पष्ट होईल. नियोजीत दुरुस्तीमधील कथन हे चूक आहे की बरोबर आहे व त्यामध्ये गुणवत्ता आहे की नाही, हे सदरचे दाव्यात दोन्ही पक्षांचा पुरावा आल्यानंतर स्पष्ट होईल. सदरच्या नियोजित दुरुस्तीमुळे कैफियतीच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही. सदरच्या नियोजित दुरुस्त्या हया दोन्ही पक्षामधील वादाचे कायमचे निराकरण करण्यासाठी आवश्यक आहेत. वर नमुद केलेल्या कारणांचा विचार करुन मी या निष्कर्षापर्यंत आलेलो आहे की, सदर नियोजित कैफियत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायाचे हितार्थ आवश्यक व गरजेचे आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

१२. सदरचे कैफियत दुरुस्तीबाबतचा मजकूर प्रतिवादींना न्यायालयीन आयुक्तांचा अहवाल आल्यानंतर माहित झाल्यामुळे त्यांच्या कैफियतीमध्ये समाविष्ठ करावयाचा आहे. त्यामध्ये त्यांची काहीही चूक

नाही. सदरचा दावा दाखल झाल्यानंतर सदरच्या अहवालाची घटना घडलेली आहे. म्हणून मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादींचा नि.क्र.४४ चा कैफियत दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.६ व १३ यांनी सदरची कैफियत दुरुस्ती १४ दिवसांच्या आत कैफियतीमध्ये करावी.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.12.12 16:13:26 +0530

दि.१२.१२.२०२५. (सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

<u>नि.दि.दा.नं.६१०/२०२३.</u>

**<u>नि.क्र.४४ खालील आदेश.</u>**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः श्री.महावीर पांडुरंग सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.१२.१२.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.१२.१२.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.१२.१२.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.१२.१२.२०२५.

स्वाक्षरीत/-

(म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.